RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ११, अंक १०२] मंगळवार, जुलै १५, २०२५/आषाढ २४, शके १९४७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २५९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## महसूल व वन विभाग

मंत्रालय, पहिला मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १५ जुलै २०२५.

## अधिसूचना

**महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम.**

क्रमांक एकत्रि-२०२१/प्र.क्र.७४/ल-१.—महाराष्ट्र धारण जमिनींचे तुकडे पाडण्यास प्रतिबंध करण्याबाबत व त्यांचे एकत्रिकरण करण्याबाबत अधिनियम (१९४७ चा मुंबई ६२) याच्या कलम ३ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या आधीच्या सर्व अधिसूचना, आदेश किंवा इतर कोणतेही संलेख यांचे अधिक्रमन करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, पुढील क्षेत्र वगळून, प्रत्येक जिल्ह्याच्या तालुक्यांची क्षेत्रे ही, उक्त अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी स्थानिक क्षेत्रे असतील असे अधिसूचित करीत आहे :—

(१) महानगरपालिका, नगरपरिषदा व **नगरपंचायती** याच्या हद्दीमधील क्षेत्र ;

(२) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) अन्वये स्थापन केलेली महानगर प्रदेश विकास प्राधिकरणे व विशेष नियोजन प्राधिकरणे यांच्या अधिकार क्षेत्राखालील निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापरासाठी नेमून दिलेली क्षेत्रे ;

(३) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) अन्वये किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये तयार केलेल्या प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेमध्ये निवासी, वाणिज्यिक, औद्योगिक किंवा इतर कोणत्याही अकृषिक वापरासाठी नेमून दिलेली क्षेत्रे ;

(४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महा. ४१) याच्या कलम ४२ड अन्वये निश्चित केलेल्या प्रारूप किंवा अंतिम प्रादेशिक योजनेत विकास करण्यायोग्य पक्षेत्रासाठी वाटप केलेले, कोणत्याही गावाच्या, शहराच्या किंवा नगराच्या हद्दीपासून २०० मीटरच्या आतील, अशा नगरच्या किंवा शहराच्या लगत असलेले “ परिघीय क्षेत्र ”.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**संजय बनकर,**
शासनाचे सहसचिव.

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, 1st Floor, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, dated the 15th July 2025.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PREVENTION OF FRAGMENTATION AND CONSOLIDATION OF HOLDINGS ACT.

No.Ektri-2021/C.R.74/L-1.—In exercise of the powers conferred by section 3 of the Maharashtra Prevention of Fragmentation and Consolidation of Holdings Act, 1947 (Mah. LXII of 1947), and in supersession of all earlier notifications, orders or any other instruments issued in this behalf, the Government of Maharashtra, hereby notifies that the areas of the Talukas of each District, excluding the following areas shall be the local area for the purposes of the said Act, namely :—

(*1*) area within the limits of Municipal Corporations, Municipal Councils and *Nagar Panchayats ;*

(*2*) areas designated for residential, commercial, industrial or any other non-agricultural use under the jurisdiction of Metropolitan Region Development Authorities and Special Planning Authorities, established under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966) ;

(*3*) areas designated for residential, commercial, industrial or any other non-agricultural use in a draft or final Regional Plan prepared under the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII of 1966), or any other law for the time being in force ;

(*4*) the Peripheral Area' within 200 meters of any village, city, or town boundary, adjacent to the limits of such town or city allocated to a developable zone in the draft or final Regional Plan as defined by section 42D of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (Mah. XLI of 1966).

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SANJAY BANKAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.